रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक १३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## दुभंगलेले ओठ व टाळू असलेल्या बालकांना मिळणार मोफत सर्वसमावेशक उपचार

### मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारातून बालकांच्या चेहऱ्यावर फुलणार हसू; राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र, बजाज फायनान्स आणि 'स्माईल ट्रेन इंडिया' यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई - प्रतिनिधी**

प्रत्येक बालकाच्या चेहऱ्यावर हसू फुलावे आणि त्याचे जीवन आनंददायी व्हावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून दुभंगलेले ओठ व टाळू या जन्मजात विकाराने ग्रस्त बालकांना आता दर्जेदार व सर्वसमावेशक उपचार मोफत उपलब्ध होणार आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने 'राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र', 'बजाज फायनान्स' आणि 'स्माईल ट्रेन इंडिया' यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार तीन वर्षांसाठी लागू राहणार आहे. जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू यामुळे निरागस बालकांच्या चेहऱ्यावरील हसू मावळून जाते. आपल्या मुलाच्या चेहऱ्यावर एकदा तरी तरी हसू बघावे यासाठी बालकांच्या आई-वडिलांची होणारी तगमग आणि त्यासाठी त्यांचे रुग्णालयाचे उंबरठे झिजवणे डोळ्यात पाणी आणते. शिवाय या विकाराचा उपचार खर्च मोठा असल्याने तो प्रत्येकच पालकाला परवडणारा नाही. याची जाणिव असणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्टिने विचार करून अशा पालकांना मोठा दिलासा दिला आहे. आता राज्यातील एकही बालक दुभंगलेले ओठ व टाळू असलेले राहणार नाही याची काळजी राज्याचा पालक या नात्याने मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे.



या सामंजस्य कराराद्वारे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) तपासणीमध्ये आढळलेल्या बालकांना जिल्हा नोडल अधिकाऱ्यांच्या औपचारिक संदर्भपत्राद्वारे 'स्माईल ट्रेन इंडिया'च्या मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येईल. संबंधित जिल्ह्यांना विशिष्ट भागीदार रुग्णालयांशी जोडण्यासाठी दोन्ही संस्था समन्वयाने काम करणार आहेत.

दुभंगलेले ओठ व टाळू यांच्या उपचारांविषयी अधिक माहितीसाठी १८००१०३८३०१ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत बालकांना शस्त्रक्रिया, रुग्णालयातील वास्तव्य, औषधे, पोषणविषयक सेवा, दंतव्यंगोपचार, वाचा उपचार तसेच गरजेनुसार प्रवासाची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. रुग्णांचे भोजन, निवास आणि प्रवासावरील खर्चही 'स्माईल ट्रेन इंडिया'कडून करण्यात येईल. शस्त्रक्रियापूर्व तपासण्या आणि उपचारांशी संबंधित शस्त्रक्रियेनंतरच्या गुंतागुंतीवरील खर्चाची जबाबदारीही संस्थेकडे राहणार आहे.

बालकांची ओळख व उपचाराची आवश्यकता निश्चित करण्यासाठी स्माईल ट्रेनची भागीदार रुग्णालये, आरबीएसके पथके आणि जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्रांच्या (डीईआयसी) (पान २ वर)

## माळी महासंघाच्या जालना जिल्हाध्यक्ष शिक्षक आघाडीपदी बाळासाहेब ठाकरे यांची निवड

**जालना – प्रतिनिधी**

अखिल भारतीय माळी महासंघाच्या जालना जिल्हाध्यक्ष (शिक्षक आघाडी) पदी मा. बाळासाहेब येडुजी ठाकरे (रा. चौधरी नगर, मंठा रोड, जालना) यांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली आहे. सदर निवड महासंघाचे जालना जिल्हाध्यक्ष मा. गणेश आसाराम हरकळ, प्रदेशाध्यक्ष (उद्योजक आघाडी) मा. श्रीहरी पांडुरंग मगर, जिल्हा उपाध्यक्ष मा. बबनराव घायाळ, जिल्हा संघटक मा. नंदकिशोर जाधव, जालना शहर कोषाध्यक्ष मा. कैलासजी काशिनाथराव रसाळ, जिल्हा सचिव मा. कान्ताराव सुंदराव शेवाळे आणि शहराध्यक्ष मा. गजाननजी खांडेभराड यांच्या सहमतीने व



मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आली.

या निवडीबद्दल अखिल भारतीय माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शंकरराव लिंगे, विश्वस्त तथा राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा. रमेशभाऊ हिरळकार, प्रदेशाध्यक्ष मा. गौतमजी क्षीरसागर आणि राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मा. अभय तायडे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे विशेष कौतुक केले.

तसेच प्रदेश उपाध्यक्ष मा. आप्पासाहेब गोरे, डॉ. सेल आघाडीचे प्रदेश संघटक मा. डॉ. गजाननजी अजगर, जाफराबाद तालुका अध्यक्ष मा. डॉ. रमेश सांडुजी मोठे, बुलडाणा जिल्हाध्यक्ष मा. विजय राजाभाऊ खरात, छत्रपती संभाजी नगर जिल्हा उपाध्यक्ष मा. अंकुश बाबुराव काळवणे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य मा. माधुकरजी घिरके, मा. राजेश द. मेहेत्रे, बुलडाणा जिल्हा सरचिटणीस मा. प्रा. दिपक नन्हई, छत्रपती संभाजी नगर जिल्हा उपाध्यक्ष मा. रमेश एकनाथ झोरे, तालुका अध्यक्ष (छत्रपती संभाजी नगर पश्चिम) मा. भिलाभाऊ तोताराम अहिरे, अंबड तालुकाध्यक्ष मा. संतोष भानुदास राऊत, पैठण तालुका अध्यक्ष मा. विष्णु आत्माराम बनकर, पैठण तालुका उपाध्यक्ष मा. सुनील बनकर आणि भोकरदन तालुक्यातील लोणगाव ग्राम शाखा अध्यक्ष मा. पवन गणेश मोरे यांच्यासह महासंघातील विविध पदाधिकाऱ्यांनी व मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्या निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, जिल्ह्यात शिक्षक आघाडीचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर राहू, असा विश्वास मा. बाळासाहेब ठाकरे यांनी व्यक्त केला.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पुतळा झाकल्याने ब्राह्मण समाज आक्रमक

### सावरकर परिसरात एकही दुकान लावता कामा नये; महापौर वंदना मगरे यांचे स्पष्ट आदेश

**जालना - प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्मारक परिसरात गणेशमूर्ती व गणेशोत्सवाच्या साहित्य विक्रीसाठी दुकाने थाटण्यात आली होती. या दुकानांमुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पुतळा झाकला जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर नगरसेवक सिद्धिविनायक मुळे यांनी तातडीने महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रार केली. त्यांच्या तक्रारीची दखल घेत अवघ्या १५ मिनिटांत अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू करण्यात



आली. नगरसेवक सिद्धिविनायक मुळे यांनी याबाबत महापौर वंदना मगरे, महानगरपालिकेचे अतिक्रमण विभागाचे संबंधित अधिकारी तसेच सदर बाजार पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. सावरकरांच्या पुतळ्यासमोर दुकाने उभारल्यामुळे स्मारकाचा परिसर झाकला जात असल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत तातडीने दुकाने हटविण्याची मागणी केली.त्यानंतर महापौर वंदना मगरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. काही वेळातच महानगरपालिका अधिकारी आणि सदर बाजार पोलिसांचे कर्मचारी सावरकर चौकात दाखल झाले.

दुकानदारांना दुकाने हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या आणि अतिक्रमण काढण्याची प्रक्रिया सुरू झाली.महापौरांचा दुकानदारांना स्पष्ट इशारामहापौर वंदना मगरे यांनी स्वतः सावरकर चौकात भेट देऊन ''सावरकर परिसरात एकही दुकान लावता कामा नये,'' असे स्पष्ट निर्देश दुकानदारांना दिले. गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव असून गणेशभक्तांच्या भावना दुखावल्या (पान २ वर)

## सावता महासंघाचा ६ वा वर्धापन दिन; १३ सप्टेंबरला भव्य सोहळा

### सावता महासंघ च्या वर्धापन दिनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहा – शाम गिराम

**सिंधीकाळेगाव -प्रतिनिधी**

सामाजिक ऐक्य, संघटन आणि समाजहिताचा संदेश देणाऱ्या सावता महासंघ महाराष्ट्र राज्याचा ६ वा वर्धापन दिन रविवार, १३ सप्टेंबर २०२६ रोजी जालना शहरातील राजारामनगर येथील समता भवन येथे उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. सावता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष अण्णा डोंगरखोस यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सावता महासंघ महाराष्ट्र राज्याच्या



संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यास संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सदस्य तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सामाजिक एकोपा मजबूत करणे, संघटनात्मक कार्याला अधिक बळ देणे आणि समाजाच्या विविध प्रश्नांवर एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प या निमित्ताने करण्यात येणार आहे.वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संघटनेच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेत भविष्यातील सामाजिक उपक्रमांची दिशाही निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे हा वर्धापन दिन सोहळा (पान २ वर)

## आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांनी स्वतःचा विकास साधावा - डॉ. महेश पाटील

### मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत व पालक मेळावा उत्साहात

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रेरण कार्यक्रम व पालक मेळावा दि. ११ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ज्ञ डॉ. महेश पाटील उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना डॉ. महेश पाटील यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने स्वतःचा विकास साधावा, असे आवाहन केले. महाविद्यालयीन जीवनात



संपूर्ण उपस्थिती, ऑनलाइन ॲड-ऑन कोर्सेस, योग्य मायनर कोर्सची निवड तसेच अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग यांना महत्त्व द्यावे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी स्क्रीन टाइम कमी करून वेळेचा सदुपयोग करावा. सध्या विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असून, विद्यार्थ्यांनी स्वतःला कौशल्यसंपन्न व परिपूर्ण बनवून आत्मविश्वासाने रोजगाराच्या संधी मिळवाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. पालकांनी वेळोवेळी महाविद्यालयात भेट देऊन आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीची विचारपूस करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, ''गर्दीत उठून दिसायचे असेल तर कन्सेप्ट क्लिअर करा,'' असा संदेश दिला. भविष्यातील संधींचा योग्य फायदा घ्या, संशोधनाची वृत्ती जोपासा, भाषेवर प्रभुत्व मिळवा, नकारात्मक विचारांपासून दूर राहा आणि उत्तम आरोग्याकडे लक्ष द्या, असे त्यांनी सांगितले. आरोग्य हीच खरी संपत्ती असून विद्यार्थ्यांनी सर्जनशील दृष्टिकोन ठेवून बचतीची सवय लावावी व अवांतर (पान २ वर)

## रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेचे आयोजन; रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचा विशेष उपक्रम

**जालना - प्रतिनिधी**

महिलांनी आपल्या आरोग्याविषयी जागरूक राहावे, नियमित तपासण्यांद्वारे संभाव्य आजारांचे वेळेत निदान व्हावे आणि महिलांमध्ये निरोगी जीवनशैलीची सवय रुजावी, या उदात्त उद्देशाने रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्यावतीने 'रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना अत्यंत सवलतीच्या दरात विविध महत्त्वाच्या वैद्यकीय तपासण्यांची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या उपक्रमाविषयी माहिती देताना रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड म्हणाल्या की, कुटुंबाची अहोरात्र काळजी घेताना महिला स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अनेक आजारांचे निदान वेळेवर झाल्यास पुढील गंभीर धोके टाळता येतात. महिलांनी स्वतः च्या स्वास्थ्याला प्राधान्य द्यावे, त्यांच्यात आरोग्याविषयी सकारात्मक स्पर्धात्मक जाणीव निर्माण व्हावी आणि प्रतिबंधात्मक तपासण्यांद्वारे महिलांचे आरोग्य सुदृढ राहावे, हाच या मिसेस आरोग्यवती स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

स्पर्धेअंतर्गत डॉक्टर आर. पी. रोडवरील रुबी हॉस्पिटलचे डॉ. राजेश सेठीया हे थायरॉईड व ब्लड शुगर टेस्ट, मंत्री हॉस्पिटलच्या डॉ. श्वेता मंत्री ह्या लिपिड प्रोफाईल टेस्ट, प्रीतीसुधा नगर येथील सम्यक हॉस्पिटचे डॉ. अतुल जिंतूरकर हे बोन डेन्सिटी टेस्ट,करतील. कसबा भागातील विठ्ठलजवळील महेश क्लिनिकच्या डॉ. अमृता महेश कुलकर्णी ह्या बॉडी फॅट ॲनालिसिस करणार असून, डॉ. अर्चना काबरा (श्री कृष्ण हॉस्पिटल), डॉ. रामेश्वर वरकड (न्यू मोंढा रोड), डॉ. धिरज छाबडा (मोतीखाना) आणि डॉ. किशोर टेपले (शतायु मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल) हे फिजिशियन अन्य तपासण्या करणार आहेत. याशिवाय, सहभागी महिलांसाठी स्तनाचा कर्करोग लवकर ओळखून प्रतिबंध करण्यासाठी 'मॅमोग्राफी' ही तपासणी श्री साई डायग्नोस्टिकच्या सहकार्याने विशेष सवलतीच्या दरात ऐच्छिक स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या स्पर्धेत केवळ पहिले २०० अर्ज करणाऱ्या महिलांनाच प्रवेश मिळणार आहे. ही स्पर्धा ४० ते ५० वर्षे, ५० ते ६० वर्षे, ६० ते ७० वर्षे यातील वयोगटांत घेतली जाणार आहे. प्रत्येक वयोगटातील विजेत्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पंचम पुरस्कारांसह इतरही अनेक आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी प्रवेश फॉर्म आर. पी. रोडवरील मंत्री हॉस्पिटल, पोस्ट ऑफिस रोडवरील श्री साई डायग्नोस्टिक सेंटर, मोदीखाना भागातील डॉ. छाबडा हॉस्पिटल, खरपुडी टी पॉइंट वरील विघ्नहर्ता मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, प्रीतीसुधानगरमधील सम्यक हॉस्पिटलमध्ये १५ ते २५ सप्टेंबर पर्यंत मिळतील. त्यांनी ते ४ ऑक्टोबरपर्यंत वरीलपैकी कोठेही जमा करावयाचे आहेत. तपासणी अहवाल सादर झाल्यानंतर विजेत्यांची निवड घोषित केली जाणार आहे. महिलांनी वेळेत फॉर्म भरून या आरोग्य चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड, सचिव डॉ. अतुल जिंतूरकर, कोषाध्यक्ष केतन शहा, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, प्रकल्प प्रमुख डॉ. आरती मंत्री, निर्मला साबू, सरिता बजाज, डॉ. चंद्रिका म्हस्के, डॉ. सुजाता देवरे, रोटरी रेनबोचे पदाधिकारी आणि सदस्यांनी केले आहे.

## श्री गणेश महासंघाच्यावतीने आयोजित चित्रकला, निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### *दानकुंवर कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या २३० विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग*

**जालना - प्रतिनिधी**

श्री गणेश महासंघ, जालना, श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित चित्रकला आणि निबंध स्पर्धेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण २३० विद्यार्थिनींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.




चित्रकला स्पर्धेत विद्यार्थिनींनी आपल्या कल्पकतेने विविध विषयांवर आकर्षक चित्रे रेखाटली, तर निबंध स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी प्रभावी शब्दांत आपले विचार मांडले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रोत्साहनपर रोख पारितोषिके देण्यात आली. यात प्रथम ३०० रुपये, द्वितीय २०० रुपये आणि तृतीय १०० रुपये अशी रोख बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थिनींना सहभाग प्रमाणपत्र वितरित करून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष आणि शालेय समितीचे सदस्य श्लोक जगदीश अग्रवाल, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री शुक्ला, श्री गणेश महासंघाचे (पान २ वर)

# संपादकीय...

## मराठवाड्यात रेल्वे क्रांतीची नांदी

मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला आता नवी गती मिळणार आहे. धाराशिवबीडछत्रपती संभाजीनगर या महत्त्वाकांक्षी २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली असून, या प्रकल्पामुळे मागासलेल्या रेल्वे सुविधांना मोठा बूस्टर मिळण्याची अपेक्षा आहे.

मराठवाड्यात रेल्वे विस्ताराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. धाराशिवबीडछत्रपती संभाजीनगर या मार्गावरील सुमारे २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच लोकसभेत याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी हा रेल्वे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या नवीन रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाले असून, अहवाल पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनासोबत पुढील चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर नीती आयोग, अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित संस्थांकडून आवश्यक मंजुरी घेतल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल. कोणत्याही मोठ्या रेल्वे प्रकल्पाला तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणून या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आहे. धाराशिव आणि बीड हे मराठवाड्यातील असे जिल्हे आहेत, जिथे रेल्वे सुविधांचा विस्तार तुलनेने कमी आहे. त्यामुळे या नवीन रेल्वे मार्गामुळे या दोन्ही जिल्ह्यांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. या मार्गामुळे प्रवास सुलभ होण्यासोबतच व्यापार, उद्योग, रोजगार आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळणार आहे. विशेष म्हणजे, हा रेल्वे मार्ग केवळ धाराशिव आणि बीड जिल्ह्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या मार्गामुळे मराठवाड्यातील विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या प्रवाशांची सोय होणार असून, या भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे. रेल्वेचा विकास हा कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. छत्रपती संभाजीनगर हे सध्या राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक म्हणून ओळखले जात आहे. औद्योगिक विकास, उत्पादन क्षेत्र आणि लॉजिस्टिक हब म्हणून या जिल्ह्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर हा प्रस्तावित नवीन रेल्वे मार्ग दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच पुढील दक्षिण भारताशी अधिक थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रेल्वे जोडणीमुळे केवळ प्रवाशांची सुविधा वाढणार नाही, तर मालवाहतुकीसाठी अधिक सक्षम आणि कार्यक्षम रेल्वे नेटवर्क उपलब्ध होणार आहे. विशेषतः शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही), अभियांत्रिकी आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना या मार्गाचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. कंटेनर, औद्योगिक कच्चामाल, तयार उत्पादने तसेच कृषी मालाची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात करणे शक्य होईल. परिणामी उद्योगांची कार्यक्षमता वाढेल आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल. हा रेल्वे प्रकल्प भविष्यात मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. दळणवळणाच्या सुविधांच्या बाबतीत मराठवाड्याने गेल्या काही वर्षांत प्रगती केली असली तरी अनेक मोठ्या प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. या भागाला सक्षम पायाभूत सुविधांची आवश्यकता असून, त्यासाठी प्रभावी नियोजन आणि मजबूत नेतृत्वाची गरज आहे. वेळेची बचत आणि जलद प्रवासासाठी आज अनेक नागरिक विमानसेवेकडे वळत आहेत. मात्र, मराठवाड्यासारख्या आठ जिल्ह्यांच्या मोठ्या विभागात सध्या केवळ छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथेच विमानसेवा उपलब्ध आहे. भविष्यात या सुविधा अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारल्यास प्रादेशिक विकासाला आणखी वेग मिळू शकतो. रेल्वे, विमान आणि रस्ते वाहतुकीचे सक्षम जाळे निर्माण झाल्यास मराठवाडा केवळ राज्याच्या नव्हे, तर देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा केंद्रबिंदूबनू शकतो. जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील नागरिकांना विमान प्रवासासाठी आजही शेकडो किलोमीटरचा प्रवास करून विमानतळ गाठावे लागते. छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथून मोजक्याच शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध असल्याने अनेक प्रवाशांना मुंबई किंवा पुणे गाठून पुढील हवाई प्रवास करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी बीड येथे विमानतळ उभारणीच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या. प्रस्तावित विमानतळासाठी बीडमध्ये तांत्रिक सर्वेक्षणही पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे बीड विमानतळाच्या उभारणीचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळते यावरच बीडकरांचे विमानतळाचे स्वप्न अवलंबून आहे.दरम्यान, लातूर विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १ जून रोजी ५६ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून लातूर विमानतळाचा विकास होऊन आगामी काळात तेथून विमानसेवा सुरू होण्याची शक्यता वाढली आहे.सध्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरू या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे. तर नांदेड विमानतळावरून बंगळुरू, हैदराबाद, गाझियाबाद, गोवा, पुणे, अहमदाबाद आणि नागपूर या शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध आहे.मराठवाड्यातील बीड आणि लातूर येथून आगामी काळात विमानसेवा सुरू झाल्यास या भागाच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नवीन रेल्वे मार्गांसोबतच विमानसेवेचा विस्तार ही मराठवाड्यासाठी निश्चितच आनंदाची बाब ठरत आहे.राज्य शासन आणि केंद्र सरकारकडून पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात असल्याने मराठवाड्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळत आहे.

# फिरकीचा जादूगार शेन वॉर्न

फिरकीचा जादुगार शेन वॉर्न याची आज जयंती. साडेचार वर्षापूर्वी ( ४ मार्च २०२२ ) रोजी क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज साडेचार वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले. १३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या एशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक गार्टिंगला ऑफ साईडला चेंडू टाकला. गार्टिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गार्टिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे.

शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता.

शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता.

निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतपद मिळवून दिले. शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# लोकभाषेतून समतेचा संदेश : श्रीचक्रधरस्वामींचे समाजप्रबोधन

महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासात बारावे-तेरावे शतक हा परिवर्तनाचा महत्त्वाचा कालखंड मानला जातो. या काळात समाजजीवनावर कर्मकांड, रूढी, जातिभेद, वर्णभेद आणि धार्मिक वर्चस्व यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर होता. अशा परिस्थितीत सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडित प्रश्नांना स्पर्श करणारा, लोकभाषेतून तत्त्वज्ञान समजावून सांगणारा आणि मानवतेला केंद्रस्थानी ठेवणारा विचारप्रवाह महाराष्ट्रात आकाराला आला. या परिवर्तनाच्या प्रवाहातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्रीचक्रधरस्वामी होय. महानुभाव पंथाचे प्रवर्तक म्हणून त्यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. लोकभाषेचा आग्रह, सर्वसामान्यांपर्यंत विचार पोहोचविण्याची भूमिका, अहिंसेचा पुरस्कार, जातिभेदाविरुद्धची भूमिका, स्त्रियांना अध्यात्मिक मार्गाची संधी आणि मराठी भाषेच्या विकासाला मिळालेली चालना या विविध अंगांनी श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा समकालीन संदर्भात विचार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. मराठी विश्वकोशानुसार त्यांचे मूळ नाव हरिपाळदेव होते. पुढे त्यांनी महाराष्ट्रात येऊन व्यापक भ्रमंती केली आणि आपल्या विचारांचा प्रसार केला. त्यामुळे त्यांच्या चरित्राचा अभ्यास करताना भक्तिपरंपरा, साहित्यिक स्रोत आणि इतिहासाधारित माहिती यांचा योग्य संदर्भात विचार करणे आवश्यक ठरते. त्यांच्या जीवनाचे महत्त्व तत्कालीन समाजाला विचार करण्यास भाग पाडणाऱ्या प्रश्नांमध्ये आणि त्यांच्या उपदेशाच्या सामाजिक परिणामांत आहे. श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांची सर्वांत महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे त्यांनी आपले तत्त्वज्ञान लोकांच्या भाषेत मांडले. त्या काळात संस्कृत ही विद्वत्तेची आणि धार्मिक ग्रंथांची प्रमुख भाषा होती. त्यामुळे सामान्य जनतेला तात्त्विक विचार सहज उपलब्ध होत नसत. श्रीचक्रधरस्वामींनी मात्र मराठीचा स्वीकार करून सामान्य माणसाशी थेट संवाद साधला. मराठी विश्वकोशात नमूद केल्याप्रमाणे ते स्वतः गुजराती भाषिक असूनही मराठी भाषेतून आपल्या विचारांचा प्रसार करीत. हा केवळ भाषेचा बदल नव्हता, तर ज्ञानाच्या सामाजिक लोकशाहीकरणाची प्रक्रिया होती. ज्ञान काही मोजक्या विद्वानांच्या हातात मर्यादित न राहता सामान्य जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे, या भूमिकेचा त्यात प्रत्यय येतो.

याच कारणामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा संबंध मराठी भाषेच्या प्रारंभीच्या विकासाशी जोडला जातो. त्यांच्या शिष्यांनी आणि अनुयायांनी पुढे मोठ्या प्रमाणावर ग्रंथनिर्मिती केली. म्हाइंभटांनी संकलित केलेले 'लीळाचरित्र' हे मराठीतील आद्य चरित्रग्रंथ मानले जाते. श्रीचक्रधरांच्या जीवनातील विविध प्रसंग, संवाद आणि उपदेश यांचे संकलन या ग्रंथात झाले. या ग्रंथाचे महत्त्व केवळ महानुभाव पंथाच्या दृष्टीने नाही, तर तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप, सामाजिक जीवन आणि लोकव्यवहार समजून घेण्यासाठीही आहे. मराठी विश्वकोशानुसार 'लीळाचरित्र' साध्या, सरळ आणि घरगुती गद्यभाषेत लिहिले गेले असून त्यातून त्या काळातील व्यवहारातील मराठीचे दर्शन घडते. श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांमध्ये मानवतेला विशेष स्थान आहे. त्यांच्या उपदेशात अहिंसेचा पुरस्कार आढळतो. हिंसा, द्वेष, अन्याय आणि सामाजिक भेदभाव यांच्या पलीकडे जाऊन मानवी जीवनाकडे पाहण्याची भूमिका त्यांच्या विचारांमध्ये दिसते. महानुभाव पंथाने जातिनिरपेक्षता आणि अहिंसेचा पुरस्कार केला, असे मराठी विश्वकोशातील विवेचनातून स्पष्ट होते. या भूमिकेचा तत्कालीन सामाजिक संदर्भ लक्षात घेतला तर त्याचे महत्त्व अधिक जाणवते. समाजात जन्माधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पना प्रबळ असताना मानवाच्या आध्यात्मिक क्षमतेचा विचार जन्मावर न करता त्याच्या आचरणाशी जोडणे ही परिवर्तनशील भूमिका होती.

श्रीचक्रधरस्वामींच्या विचारातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मोक्षमार्ग सर्वांसाठी खुला असावा, ही भूमिका. त्या काळातील धार्मिक जीवनात सामाजिक स्तरानुसार अनेक प्रकारच्या मर्यादा अस्तित्वात होत्या. महानुभाव परंपरेत स्त्रिया आणि समाजातील विविध स्तरांतील व्यक्तींना आध्यात्मिक साधनेची संधी मिळाल्याचे उल्लेख आढळतात. स्त्री-शूद्रांना मोक्षमार्ग खुला करण्याच्या भूमिकेचा उल्लेख महानुभाव पंथाच्या अभ्यासात केला जातो. त्यामुळे आध्यात्मिक समानतेची कल्पना ही त्यांच्या परंपरेतील महत्त्वाची बाब मानता येते. आजच्या संविधानिक समतेच्या युगात या विचारांकडे पाहताना त्यातील मानवकेंद्री मूल्य विशेष अधोरेखित होते. श्रीचक्रधरस्वामींचे कार्य समजून घेताना त्यांचे गुरू श्रीगोविंदप्रभू यांचाही संदर्भ महत्त्वाचा आहे. महानुभाव परंपरेनुसार गोविंदप्रभू हे चक्रधरस्वामींचे गुरू होते. गोविंदप्रभूंच्या जीवनचरित्रातही रूढ सामाजिक चौकटींपलीकडे जाणारे मानवतावादी वर्तन दिसते. अनाथ आणि असहाय व्यक्तींना आधार देणे, सामाजिक भेदांच्या पलीकडे जाणे आणि माणसाला माणूस म्हणून स्वीकारणे या गुणांचा उल्लेख त्यांच्या चरित्रपरंपरेत आढळतो. या गुरुपरंपरेतून चक्रधरस्वामींच्या विचारांना आकार मिळाला, असे महानुभावीय साहित्याच्या संदर्भातून दिसून येते. श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे कर्मकांडापेक्षा अंतःकरणातील आचरणाला दिलेले महत्त्व होय. धर्म हा केवळ बाह्य विधी, आडंबर किंवा कर्मकांडांपुरता मर्यादित नसावा, तर तो व्यक्तीच्या नैतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाशी जोडला गेला पाहिजे, असा त्यांच्या विचारांचा आशय दिसतो. त्यांनी सामान्य माणसाच्या अनुभवविश्वातून तत्त्वज्ञान स्पष्ट केले. त्यामुळे त्यांचा संवाद हा केवळ विद्वानांशी नव्हता; तो शेतकरी, कामकरी, स्त्री, सामान्य गृहस्थ आणि विविध सामाजिक स्तरांतील लोकांशी होता. ज्ञानाची भाषा लोकांना समजणारी असावी, ही त्यांची भूमिका आजच्या शिक्षणव्यवस्थेच्या संदर्भातही महत्त्वाची वाटते. त्यांच्या विचारांमध्ये 'दृष्टांत' या पद्धतीचा वापर विशेष उल्लेखनीय आहे. एखादा अवघड तात्त्विक विचार थेट आणि गुंतागुंतीच्या भाषेत सांगण्याऐवजी दैनंदिन जीवनातील उदाहरणाद्वारे स्पष्ट करणे ही प्रभावी संवादपद्धती आहे. आज शिक्षणशास्त्रात अनुभवाधारित शिक्षण, संदर्भाधारित शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्री शिक्षण यांना मोठे महत्त्व दिले जाते. श्रीचक्रधरस्वामींच्या उपदेशपरंपरेतील दृष्टांतपद्धतीचा विचार केला तर लोकांच्या अनुभवांशी जोडून विचार मांडण्याची ही जुनी आणि प्रभावी परंपरा होती, असे दिसून येते.

श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रापुरता राहिला नाही. महानुभावीय साहित्याने मराठी गद्याला महत्त्वपूर्ण योगदान दिले. चरित्रग्रंथ, सूत्रग्रंथ, भाष्यग्रंथ, तात्त्विक लेखन, काव्य, स्थलवर्णन आणि विविध प्रकारच्या साहित्यनिर्मितीमुळे मराठीच्या अभिव्यक्तीक्षमतेत भर पडली. मराठी विश्वकोशाच्या विवेचनानुसार महानुभावीय वाङ्मयाने प्रारंभीच्या मराठी गद्याचे दालन समृद्ध केले. व्याकरण, तत्त्वज्ञान, साहित्य आणि भाष्यपरंपरेच्या निर्मितीतही या साहित्यपरंपरेचे योगदान आहे. त्यामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचा विचार करताना मराठी भाषा आणि साहित्याच्या इतिहासातील त्यांचे स्थान दुर्लक्षित करता येणार नाही. या परंपरेतील महिलांच्या सहभागाचाही स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. महानुभावीय परंपरेत महदाइसा किंवा महदंबा यांसारख्या स्त्रियांचे योगदान आढळते. महदंबा ही बुद्धिमान आणि विरक्त स्त्री होती, तसेच 'लीळाचरित्रा'च्या संकलनाच्या कार्यात तिची मदत झाली असावी, असे मराठी विश्वकोशातील नोंदीवरून दिसते. या संदर्भामुळे मध्ययुगीन धार्मिक-सांस्कृतिक जीवनात स्त्रियांचा सक्रिय सहभाग आणि त्यांच्या बौद्धिक क्षमतेची दखल घेणाऱ्या परंपरांचा अभ्यास करण्यास नवे आयाम मिळतात. आजच्या काळात श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांकडे पाहताना त्यांचे ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही मध्ययुगीन विचारवंताचे मूल्यमापन आधुनिक मूल्यांच्या चौकटीत सरळपणे करणे योग्य नाही.

# पान १ वरुन...

पान १ वरुन...

### दुभंगलेले ओठ व...

समन्वयाने तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. दुभंगलेले ओठ व टाळू असलेल्या बालकांची ओळख पटविण्यासंदर्भात शासकीय आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शनही दिले जाईल.

उपचारासाठी रुग्ण पाठविणे, त्यांच्या नोंदी ठेवणे आणि जिल्हा नोडल अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी प्रत्येक मान्यताप्राप्त रुग्णालयाचा प्रकल्प संचालक नोडल अधिकारी म्हणून काम करणार आहे. संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णालयातील शस्त्रक्रियागृहाच्या सुविधा आणि भूलतज्ज्ञांची उपलब्धता यांची खातरजमा करतील. राज्यातील या १५ रुग्णालयांमध्ये होणार उपचार

या करारांतर्गत राज्यातील १५ मान्यताप्राप्त रुग्णालयांत या व्याधीवर उपचार उपलब्ध होतील

१. आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा
२. आनंदऋषीजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर, अहिल्यानगर
३. आस्था प्लास्टिक सर्जरी हॉस्पिटल, जळगाव
४. बेंबडे हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर
५. एलिट कॉस्मो क्लिनिक अँड प्लास्टिक सर्जरी हॉस्पिटल, सोलापूर
६. लहाने हॉस्पिटल, लातूर
७. मीरा एनएक्स हॉस्पिटल, मुंबई
८. एमआरआर चिल्ड्रन्स हॉस्पिटल, ठाणे
९. पूना हॉस्पिटल, पुणे
१०. सहयोग हॉस्पिटल, गोंदिया
११. श्रीराम हॉस्पिटल, अकोला
१२. शुश्रूषा सिटिझन्स को-ऑपरेटिव्ह हॉस्पिटल, मुंबई
१३. स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन हॉस्पिटल, नागपूर
१४. वेदांत हॉस्पिटल प्रा. लि., नाशिक
१५. वेस्टर्न इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस (विन्स), कोल्हापूर.

कार्यक्रमाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यासाठी दोन्ही संस्थांच्या प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक यांच्यामार्फत या प्रकल्पाचे नियमित त्रयस्थ मूल्यमापन करण्यात येईल.

### स्वातंत्र्यवीर...

जाऊ नयेत, त्याचबरोबर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्मारकाचे पावित्र्यही कायम राहावे, याची काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तक्रारीनंतर तातडीने कारवाईसावरकर स्मारक परिसरातील अतिक्रमणाबाबत नगरसेवक सिद्धिविनायक मुळे यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेतल्याचे यावेळी दिसून आले.

### आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांनी...

वाचन करावे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणातून नवीन शिकण्याची व स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची इच्छा निर्माण झाली पाहिजे, असे सांगितले. तसेच पालकांनी आपल्या पाल्यांना योग्य मार्गदर्शन व आधार द्यावा, असे आवाहन केले. याप्रसंगी सहायक प्रशासकीय अधिकारी श्री. आर. ए. भालेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य प्रा. आर. एल. करवंदे, पालक प्रतिनिधी संदीप पवार व मुक्ताराम भापकर, अध्यापक विकास प्रमुख डॉ. ए. खान, प्रथम वर्ष विभागप्रमुख डॉ. डी. एम. सोळंके, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रथम वर्षाच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. डी.एम. सोळंके आणि सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. पंकज भोयर यांनी केले.

### श्री गणेश महासंघाच्यावतीने...

महासचिव भूषण यादव, कार्याध्यक्ष महेश धन्नावत, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, उपाध्यक्ष गौरव बोरा, डॉ. शिवदत्त विजयसेनानी, आनंद बंब, युवा उद्योजक अर्जुनजी पित्ती, मार्गदर्शक बाबा नंद यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या कलात्मक व बौद्धिक कौशल्याचे कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी चंद्रकांत दायमा, दिपाली कुलकर्णी, मीनाक्षी दुर्गम, दिपाली अग्रवाल, श्री. राठी, श्री. जैन आणि ज्योती पोहेकर यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत दायमा यांनी केले तर उपस्थितांचे आभार दिपाली कुलकर्णी यांनी मानले.

### सावता महासंघाचा...

समाजबांधवांसाठी विशेष महत्त्वाचा ठरणार आहे. या कार्यक्रमास सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन सावता महासंघ चे सोशल मिडीया जालना जिल्हा अध्यक्ष शाम गिराम यांनी केले आहे.

# महाराष्ट्रासह देशात बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी!

संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.

याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.

हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिध्दी आणि दुसरीचे नाव सिध्दी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.

आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.

त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व असून वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी ''गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या''घोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली.गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा-अर्चना केली जाते.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा, बेल-फुल,शम्मीपत्र,शेंदूर यांचा मुख्यत्वे करून वापर होतो. भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ-मोठी नामांकित मंदिरे आहेत. त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला द्वी-देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा-महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल.गणपती बाप्पा मोरया!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# रुग्णालयातील अस्वच्छता आणि निकृष्ट सेवेवर ग्राहक न्यायालयाचा मोठा दणका

रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना अस्वच्छ आणि निकृष्ट दर्जाच्या सुविधा देणे एका नामांकित रुग्णालयाला चांगलेच महागात पडले असून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने या प्रकरणी रुग्णालयाला दंड ठोठावला आहे. प्रतिभा कपूर यांनी प्रसूती उपचारांसाठी ७५,००० रुपयांचे विशेष प्रसूती पॅकेज नोंदवले होते, ज्या अंतर्गत सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे एका निरोगी बालिकेचा जन्म झाला. मात्र, उपचारादरम्यान रुग्णालयाकडून अत्यंत निकृष्ट दर्जाच्या सुविधा पुरवण्यात आल्या. रुग्णाच्या नातेवाईकांसाठी बसण्यास दिलेला सोफा अतिशय मळलेला, दुर्गंधीयुक्त आणि अस्वच्छ होता, जो वारंवार तक्रार केल्यानंतर तब्बल दोन दिवसांनी बदलण्यात आला. याशिवाय रुग्णाला देण्यात आलेले टॉवेल्स फाटलेले व अस्वच्छ होते.

तसेच प्रसूतीनंतर पिण्यासाठी दिलेल्या सूपमध्ये चक्क प्लास्टिकचा तुकडा आढळून आल्याने रुग्णाच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला होता. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत ग्राहक तक्रार निवारण आयोग, साहिबजादा अजितसिंग नगर (मोहाली) येथील माननीय अध्यक्ष एस. के. अग्रवाल आणि सदस्या श्रीमती परमजीत कौर यांच्या पीठाने ग्राहक तक्रार क्रमांक ७५ / २०२३ (दाखल दिनांक: २१ फेब्रुवारी २०२३) वर १७ जुलै २०२६ रोजी निकाल दिला. आयोगाने नमूद केले की वैद्यकीय उपचार सुरळीत झाले असले तरी रुग्णालयाने स्वच्छता, टापटीप आणि अन्नाच्या गुणवत्तेमध्ये दाखवलेला निष्काळजीपणा ही सेवेतील गंभीर त्रुटी आहे. त्यामुळे आयोगाने रुग्णालयाला ३०,००० रुपयांची नुकसानभरपाई व न्यायालयीन खर्च ३० दिवसांच्या आत देण्याचे आदेश दिले असून मुदतीत रक्कम न दिल्यास त्यावर वार्षिक ९ टक्के व्याज आकारले जाईल असे स्पष्ट केले आहे. या ऐतिहासिक निकालावर प्रतिक्रिया देताना कायदेतज्ज्ञ ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, रुग्णालयांनी केवळ उपचारांचे अव्वाच्या सव्वा बिल वसूल करून चालत नाही, तर रुग्णाला निर्जंतुक, स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण देणे हे त्यांचे कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य आहे. अस्वच्छता आणि दूषित अन्न रुग्णाच्या जिवावर बेतू शकते, त्यामुळे अशा निष्काळजीपणाला अजिबात थारा मिळता कामा नये. पुढे बोलताना ॲड. महेश धन्नावत यांनी ठामपणे नमूद केले की, नेमक्या याच नियमांची आणि मानकांची कठोर अंमलबजावणी जालना शहरातील सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये तात्काळ होणे अत्यंत गरजेचे आहे.

जालन्यातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी जालना महानगरपालिका आणि जिल्हा आरोग्य प्रशासनाने सर्व रुग्णालयांची नियमित तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांनीही अशा अन्यायाविरोधात ग्राहक मंचाकडे दाद मागावी, असे आवाहन त्यांनी केले.

## कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात आज ६७ अर्ज प्राप्त

छत्रपती संभाजीनगर (जिमाका)- जिल्ह्यात कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वितरणासाठी आज आयोजीत ११ विशेष मंडळस्तरीय शिबिरांमध्ये एकूण ६७ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती महसूल यंत्रणेने दिली आहे. आज जिल्ह्यात कांचनवाडी, शेकटा ता. छत्रपती संभाजीनगर, पैठण, पिंपळवाडी ता. पैठण, वेरुळ ता. खुलताबाद, हतनूर, चिकलठाण ता. कन्नड, हर्सूल, डोणगाव ता. गंगापूर, खंडाळा, बोरसर ता, वैजापूर अशा ११ ठिकाणीही शिबिरे झाली.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शिबिरात ११, वैजापूर तालुक्यात १०, गंगापूर तालुक्यात ३, कन्नड तालुक्यात १९, खुलताबाद तालुक्यात २४असे एकूण ६७ अर्ज प्राप्त झाले.

या प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार आहे.

# १०० वे साहित्य संमेलन उत्सवप्रियतेकडून वैचारिक मंथनाकडे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऐतिहासिक प्रांगणात होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा बिगुल वाजला आहे. त्यासोबतच साहित्याचे व्यासपीठ नेमके कोणाचे आणि कशासाठी? हा मराठी जगतातील सर्वात जुना यक्षप्रश्न पुन्हा एकदा नव्या उग्रतेने आणि अधिक तीव्रतेने समोर येतो. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानड्यांनी १४८ वर्षांपूर्वी १८७८ मध्ये ज्या ज्ञानसत्राचे पहिले बीज रोवले, त्या परंपरेचे आज शंभरावे पाऊल पडत आहे. हा केवळ एका आकड्याचा खेळ नाही, तर मराठी भाषेच्या, संस्कृतीच्या आणि विचारविश्वाच्या प्रवासातील एक ऐतिहासिक मैलाचा दगड आहे. परंतु, आज या शतक महोत्सवी सोहळ्याकडे पाहताना आनंदापेक्षा चिंता आणि अभिमानापेक्षा आत्मपरीक्षणाची गरज अधिक भासत आहे. राज्य सरकारने या ऐतिहासिक संमेलनासाठी पाच कोटी रुपयांचा अभूतपूर्व निधी मंजूर केला असून, संमेलनापूर्वी ९९ पूर्वतयारी उपक्रम, यासाठी दहा ते बारा कोटींचा निधी उपलब्ध करून दिले असल्याचे समजते.

( छोटेखानी संमेलने.) आणि १३ विद्यार्थी संमेलनांचे जंगी नियोजन सुरू आहे. काही ठिकाणी नांदी संमेलनास सुरुवात झाली आहे. पण, कोट्यवधी सुजाण मराठी वाचकांच्या मनात एकच धास्ती आहेहा सोहळा केवळ चार दिवसांचा सरकारी आणि राजकीय भपका ठरणार की मराठी भाषेला पुढील शंभर वर्षांची दिशा देणारे वैचारिक विचारपीठ बनणार? आज मराठी साहित्याच्या दारात राजकारणी, व्ही.आय.पी. पाहुणे आणि सत्कारमूर्तींची अवाढव्य गर्दी उभी राहिलेली दिसते! व्यासपीठावर नेत्यांची गर्दी, मंत्र्यांच्या स्वागतासाठी धावणारी आयोजकांची यंत्रणा, मिनिटा-मिनिटाला शाल-श्रीफळांचा होणारा पाऊस, तासनतास चालणारे कंटाळवाणे सत्कार सोहळे आणि या सगळ्या गदारोळात व्यासपीठाच्या एका कोपऱ्यात बिचारे मान खाली घालून बसलेले खरे साहित्यिक... हे चित्र आजवर आपण प्रत्येक साहित्य संमेलनात पाहिले आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळालेल्या या सुवर्णकाळात जर साहित्याच्या पवित्र मंदिराला राजकारणाच्या आणि उथळ सत्कार संस्कृतीच्या विळख्यातून मुक्त करता आले नाही, तर हा सोहळा म्हणजे केवळ कोरडी उत्सवप्रियता ठरेल. आज वेळ आली आहे ती एका मोठ्या बदलाचीव्यासपीठावरून राजकीय हस्तक्षेप पूर्णपणे हद्दपार करण्याची, निरर्थक सत्कार सोहळ्यांना पूर्णविराम देण्याची आणि थेट मूळ साहित्य विषयावर सडेतोड चर्चा घडवून आणण्याची. या पार्श्वभूमीवर, शंभराव्या संमेलनाचा एकसंध आकृतिबंध कसा असावा आणि महाराष्ट्राच्या सुजाण वाचकांच्या आयोजकांकडून नेमक्या काय अपेक्षा आहेत, याचा वेध घेणे अत्यंत गरजेचे आहे.

राजकीय हस्तक्षेपाची सावली विरुद्ध स्वायत्त साहित्य विश्वाचा हुंकार अशी परिस्थिती आहे. गेल्या काही दशतकांत मराठी साहित्य संमेलनांना लागलेले सर्वात मोठे गालबोट म्हणजे राजकीय नेत्यांचा वाढता हस्तक्षेप आणि व्यासपीठांवरील त्यांचे वर्चस्व. उद्घाटनापासून ते समारोपा पर्यंत राजकीय नेत्यांची उठबस, त्यांच्या अवतीभोवती फिरणारी सुरक्षा यंत्रणा आणि त्यांच्या स्वागतासाठी होणारी चढाओढ यात मूळ साहित्य आणि साहित्यिक बाजूला फेकले जातात.




वर्ध्याच्या साहित्य संमेलनात तर संमेलनाच्या अध्यक्षांना व्यासपीठापर्यंत जाण्याला अडवले गेले होते.अशी परिस्थिती का निर्माण व्हावी.?

लोकशाहीत राजकारण अपरिहार्य असले, तरी साहित्याच्या स्वायत्त व्यासपीठावर राजकारण्यांनी केवळ अतिथी म्हणून यावे, यजमान म्हणून नव्हे. जेव्हा एखादे साहित्य संमेलन राजकीय नेत्यांच्या अजेंड्यानुसार चालते, तेव्हा साहित्यातील मुक्त अभिव्यक्तीला आपोआपच मर्यादा येतात. लेखकाने समाजातील विसंगतींवर, सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या धोरणांवर आणि सामाजिक अन्यायावर बोट ठेवणे अपेक्षित असते. परंतु, जर संमेलनाची दोरीच राजकीय नेत्यांच्या हाती असेल, तर तिथून सडेतोड वैचारिक मंथन कसे होणार? शंभराव्या संमेलनाच्या निमित्ताने ही राजकारणाची सावली साहित्यावरून दूर व्हायला हवी. नेत्यांना व्यासपीठावर स्थान देण्याऐवजी त्यांना समोरील प्रेक्षकगृहात मानाचे स्थान द्यावे, आणि राजकीय नेत्यांनी रसिक म्हणून साहित्य संमेलनात कार्यक्रमाचा मोकळेपणाने आस्वाद घ्यावा. व्यासपीठ केवळ आणि केवळ सरस्वतीच्या उपासकांसाठी राखीव ठेवण्याचे धाडस पुण्यात आयोजकांनी दाखवले पाहिजे. तरच या शतक महोत्सवाचे नाविन्य दिसून येईल.

सत्कार सोहळ्यांचा अतिरेक त्यामुळे वेळेचा अपव्यय होतो. साहित्य संमेलनांचे आणखी एक विदारक रूप म्हणजे मिनिटा-मिनिटाला होणारे सत्कार आणि शाल-श्रीफळांचा सुळसुळाट. प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला स्वागत, परिचय, सत्कार आणि आभार प्रदर्शनातच अर्ध्याहून अधिक वेळ निघून जातो. ज्या मुख्य विषयावर चर्चा होणे अपेक्षित असते, त्यासाठी वक्त्यांना शेवटी केवळ पाच ते सात मिनिटे दिली जातात. वेळेअभावी घाई करावी लागत आहे हे वाक्य प्रत्येक साहित्य संमेलनात पालुपदासारखे ऐकायला मिळते.हे साहित्य संमेलन आहे का सत्कार संमेलन ? हा प्रश्न पडावा. शंभराव्या संमेलनात ही सत्कार संस्कृती पूर्णपणे मोडीत काढण्याची गरज आहे. व्यासपीठावर या औपचारिकतेचा अतिरेक टाळून तो मौल्यवान वेळ लेखकांच्या वाचनासाठी, कवींच्या कवितांसाठी आणि वक्त्यांच्या विचार मांडण्यासाठी वापरला गेला पाहिजे. वाचकांना नेत्यांचे किंवा आयोजकांचे चेहरे पाहण्यात रस नसतो, त्यांना लेखकांचे विचार ऐकायचे असतात, हे भान आता तरी ठेवले पाहिजे.

संमेलनात विद्यार्थी अन् युवकांचा सहभागही महत्त्वाचा आहे. १०० व्या संमेलनाचे सर्वात मोठे बलस्थान ठरले पाहिजे ते म्हणजे तरुण पिढी. आजवरची संमेलने ही ज्येष्ठ नागरिकांचे किंवा निवृत्तांचे मेळावे वाटत आली आहेत. हे चित्र बदलण्याची सुवर्णसंधी पुण्यात उपलब्ध आहे, कारण पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आणि लाखो तरुणांचे आश्रयस्थान आहे. संमेलनाचे केवळ १३ औपचारिक विद्यार्थी सोहळे करून भागणार नाही, तर मुख्य संमेलनात तरुणांना निर्णायक वाटा द्यावा लागेल. आजचा युवक हा तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. तो सोशल मीडिया, पॉडकास्ट, ब्लॉग आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून स्वतःचे साहित्यविश्व उभे करत आहे. या लिहित्या हातांना मुख्य व्यासपीठावर जागा मिळाली पाहिजे. जोपर्यंत कॉलेजचे कट्टे, विद्यापीठांचे कव्हरेज आणि तरुणांची ऊर्जा या संमेलनाला जोडली जात नाही, तोपर्यंत साहित्याचा प्रवाह जिवंत राहू शकत नाही.

मराठी केवळ संवादाची नव्हे, ज्ञानभाषा होणे ही काळाची गरज आहे.मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला, हे अत्यंत भूषणावह आहे. परंतु, केवळ अभिजाततेचा टेंभा मिरवून भाषा टिकत नसते. मराठी ही आता ज्ञानभाषा झाली पाहिजे, हा या १०० व्या संमेलनाचा मुख्य अजेंडा असायला हवा. ज्ञानभाषा म्हणजे काय? तर विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय, अभियांत्रिकी, कायदा आणि अर्थशास्त्र यांसारख्या आधुनिक क्षेत्रातील उच्च शिक्षण मराठीतून उपलब्ध झाले पाहिजे. आज मराठी माणूस घरात मराठी बोलतो, पण व्यवहारात आणि नोकरीत त्याला इंग्रजीचाच आश्रय घ्यावा लागतो. जोपर्यंत जागतिक स्तरावरील उच्च ज्ञान मराठीत अनुवादित होत नाही आणि मराठी ही रोजगाराची, अर्थार्जनाची भाषा बनत नाही, तोपर्यंत भाषा समृद्ध होणार नाही. संमेलनात या विषयावर केवळ भावनिक भाषणे न होता, विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंची आणि तज्ज्ञांची एक विशेष कार्यशाळा घेऊन मराठी ज्ञानभाषा करण्याचा ठोस कृती आराखडा जाहीर केला पाहिजे.प्रकाशकांना दालनासाठी कमी दर आकारणी करायला हवी. वाचनसंस्कृती कोणत्याही साहित्य संमेलनाचा खरा आत्मा आहे. तिथले ग्रंथ प्रदर्शन किंवा पुस्तकांची दालने यांचा सहभाग फार महत्त्वाचा आहे. दुर्दैवाने, गेल्या काही वर्षांत ग्रंथदालनांचे भाडे इतके गगनाला भिडले आहे की, छोट्या आणि प्रामाणिक प्रकाशकांना संमेलनात स्टॉल लावणे अशक्य झाले आहे. अशा वेळी केवळ व्यावसायिक आणि बडे प्रकाशकच तिथे तग धरू शकतात. शंभराव्या संमेलनात ही चूक सुधारली पाहिजे. राज्य सरकारने दिलेल्या ५ कोटींच्या निधीचा वापर करून, प्रकाशकांना अत्यंत नाममात्र किंवा कमी दरात स्टॉल्स उपलब्ध करून दिले पाहिजेत. प्रकाशकांवरील आर्थिक बोजा कमी झाला, तरच ते वाचकांना मोठ्या सवलतीत पुस्तके देऊ शकतील. पुस्तके स्वस्त मिळाली, तरच सामान्य वाचक, गरीब विद्यार्थी ती खरेदी करतील. संमेलनाचा मंडप किती चकचकीत आहे यापेक्षा, ग्रंथदालनात पुस्तकांचा किती सुकाळ आहे आणि तिथे किती पुस्तकांची विक्री झाली, यावर संमेलनाचे यश मोजले गेले पाहिजे.एकाच वेळी अनेक कार्यक्रमा मुळे रसिकांची कोंडी आणि नियोजनाचा बोजवारा साहित्य संमेलनांमधील नियोजनाचा आणखी एक मोठा त्रुटीयुक्त पैलू म्हणजे समांतर सत्रे किंवा एकाच वेळी अनेक कार्यक्रम असणे. मुख्य व्यासपीठावर परिसंवाद सुरू असतो, त्याच वेळी दुसऱ्या हॉलमध्ये कथाकथन चालू असते आणि तिसऱ्या बाजूला कविकट्टा सुरू असतो. यामुळे संमेलनाला येणाऱ्या रसिकांची मोठी कोंडी होते.



एखाद्या वाचकाला समकालीन कादंबरीवरची चर्चाही ऐकायची असते आणि कवींच्या कविताही ऐकायच्या असतात. मात्र, एकाच वेळी अनेक कार्यक्रम असल्यामुळे त्याला एकाच गोष्टीची निवड करावी लागते. परिणामी, रसिकांची विभागणी होते आणि गर्दी विखुरली जाते. शंभराव्या संमेलनात अशा समांतर सत्रांची संख्या मर्यादित ठेवून, प्रमुख कार्यक्रमांचे वेळापत्रक एकसंध आणि रसिकस्नेही पद्धतीने आखले पाहिजे.प्रतिसाद नसलेल्या कार्यक्रमांचा विचार व्हायला हवा.( काव्य कट्ट्याचे उदाहरण ) नियोजनाचा थेट परिणाम काही विशिष्ट कार्यक्रमांवर होतो. उदाहरणार्थ, संमेलनातील काव्य कट्टा किंवा काही दुय्यम परिसंवाद अशा ठिकाणी रसिकांचा प्रतिसाद अत्यंत नगण्य असतो किंवा अनेकदा तिथे शुकशुकाट पाहायला मिळतो. मुख्य व्यासपीठावरील व्ही.आय.पी. गर्दी किंवा समांतर सुरू असलेल्या प्रसिद्ध कार्यक्रमांमुळे या कट्ट्यांकडे रसिक फिरकतच नाहीत. केवळ कार्यक्रम पत्रिकेत नाव हवे किंवा काही कवींची सोय लावायची आहे, म्हणून असे कार्यक्रम रेटणे बंद केले पाहिजे. ज्या कार्यक्रमांना रसिकांचा प्रतिसाद नाही, त्याविषयी आयोजकांनी गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. अशा सत्रांचे स्वरूप बदलावे, त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडावे किंवा त्यांचे वेळेचे नियोजन बदलावे. दर्जा नसलेल्या आणि श्रोते नसलेल्या कार्यक्रमांवर वेळ आणि पैसा खर्च करण्यापेक्षा, कार्यक्रमांची संख्या कमी करून त्यांची गुणवत्ता वाढवण्यावर भर दिला पाहिजे. काही साहित्यावर चर्चा घडवून आणली पाहिजे. अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संमेलनाचे अध्यक्षांना संमेलनात होणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा ठरवितांना विचारात घेतले जायला हवे. कारण माजी संमेलनाध्यक्षा तारा भवाळकर यांच्या एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, पत्रिका समोर आल्यानंतरच मला काय कार्यक्रम आहे हे समजले. पत्रिका तयार करताना माझे मत विचारात घेतले नव्हते.

चार दिवसांचा हा ऐतिहासिक सोहळा संपल्यानंतर जेव्हा संमेलनाची सांगता होईल, तेव्हा मराठी माणसाच्या हातात काय उरले असेल? केवळ काही गाजलेल्या भाषणांच्या क्लिप्स, मंत्र्यांचे फोटो, जेवणाची स्तुती आणि व्ही.आय.पी. पाहुण्यांचे व्हीडिओ? का मराठी भाषेच्या समृद्धीचा, तिला ज्ञानभाषा करण्याचा आणि तिच्या डिजिटलायझेशनचा एक ठोस कृती आराखडा? १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा केवळ एक उत्सव नाही, तर ती एक ऐतिहासिक जबाबदारी आहे. हे संमेलन राजकीय कुरघोडीचे मैदान बनू नये, तर वैचारिक देवाणघेवाणीचे पवित्र मंदिर बनावे. मोठ्या प्रमाणावर होणारे सत्कार टाळून, राजकीय नेत्यांचा वाढता हस्तक्षेप नाकारून, तरुणांना सोबत घेऊन आणि प्रकाशकांना बळ देऊन जेव्हा केवळ साहित्यावर, पुस्तकांवर आणि भाषेवर सखोल चर्चा होईल, तेव्हाच या शंभराव्या संमेलनाचे सार्थक होईल. पुण्याला होणारे शतक महोत्सवी साहित्य संमेलनाकडून कडून वाचकांच्या रसिकांच्या अनेक अपेक्षा आहे. त्या पूर्ण होतील अशी आशा बाळगू या. पुण्याच्या विद्यापीठातील हे शतक महोत्सवी साहित्य संमेलन मराठी भाषेला पुढील शंभर वर्षांची ऊर्जा देणारे ठरो, हीच संपूर्ण मराठी जगताची आणि सुजाण वाचकांची आग्रही अपेक्षा आहे!

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**८९९९५६६९१७**

# वंचित बहुजन आघाडी घनसावंगी तालुक्याची संघटनात्मक आढावा बैठक उत्साहात संपन्न

**घनसावंगी – प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी, घनसावंगी तालुका जि. जालना च्या वतीने आयोजित संघटनात्मक आढावा बैठक पंचायत समिती रोड, तहसील कार्यालय, घनसावंगी येथे नुकतीच मोठ्या उत्साहात संपन्न झाली. आगामी काळातील संघटनात्मक बांधणी आणि पक्षाच्या ध्येयधोरणांचा प्रचार-प्रसार गतीने करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मुख्य मार्गदर्शक म्हणून वंचित च पूर्व जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात यांनी उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी संघटनेच्या मजबुतीसाठी आणि तळागाळातील लोकांपर्यंत पक्षाचे विचार पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय राहण्याचे आवाहन केले. तसेच संदर्भात मतदार याद्यांची पडताळणी आणि गाव तिथे शाखा उभा करण्यासाठी कृती कार्यक्रम हाती घ्यावा यावर मार्गदर्शन केले. या बैठकीस जिल्हा आणि तालुका पातळीवरील प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती लाभली. यामध्ये परमेश्वर खरात (जिल्हाउपाध्यक्ष, जालना पूर्व), जमिर शेख (जिल्हासचिव, जालना पूर्व), देविदास भाई कोळे नेते (घनसावंगी), समाधान तोडके (तालुकाध्यक्ष, घनसावंगी), हनुमंत मोरे (तालुकाध्यक्ष, परतूर), बैठकीचे नियोजन घनसावंगी तालुका कमिटीच्या वतीने करण्यात आले होते. या मध्ये बाबासाहेब गालफाडे, बाळासाहेब सोनवणे, सतिश पटेकर, राजू शरणांगत, गौतम पटेकर, अतिश वानखेडे, राजकिरण राजगुरु, शंकर भालेकर, ओम खरात, वसंत मोरे, शरद कोळे आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. बैठकीत तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






अंबड तालुक्यातील बठाण खुर्द येथील जिल्हा परिषद शालेय समितीच्या उपाध्यक्षपदी सुरेश वीर यांची निवड झाली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना भगवान मुळे व निवृत्ती शेळके

# रोजगार महाकुंभ दि.२९ रोजी; जिल्ह्यात २१ ठिकाणी भरती मेळावे

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

राज्यातील युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने ''रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६'' हा उपक्रम संपूर्ण राज्यात मंगळवार दि.२९ रोजी आयोजीत करण्यात आला आहे. या उपक्रमात अधिकाधिक युवक- युवतींनी सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त.राजु वाकुडे यांनी केले आहे. या उपक्रमांतर्गत राज्यभर एकाच दिवशी ८०० रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही मंगळवार दि.२९ रोजी आसावा ब्रदर्स कॉमर्स कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, सीएसएमएसएस () छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, पैठण रोड, एमआयडीसी कौशल्य विकास केंद्र, शेंद्रा एमआयडीसी, सीएसएमएसएस () पॉलिटेक्निक महाविद्यालय, पैठण रोड, सेतू चॅरिटेबल ट्रस्ट, भडकल गेट जवळ, देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (), रेल्वे स्टेशन रोड, कैलास शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (), खुलताबाद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, विद्यापीठ परिसर याशिवाय जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था () जसे की गंगापूर, वैजापूर, कन्नड, फुलंब्री, सोयगाव आणि सिल्लोड अशा विविध २१ ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात दहावी व बारावी उत्तीर्ण उमेदवार, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर व पदव्युत्तर उमेदवार, डिप्लोमा व अभियांत्रिकी पदवीधारक, अल्पमुदतीचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार, आयटीआय उत्तीर्ण तसेच अंतिम वर्षातील प्रशिक्षणार्थी आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या पात्र युवक-युवतींना सहभागी होता येणार असून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. रोजगार मेळाव्याची ठिकाणे, सहभागी आस्थापना, उपललब्धता, रिक्तपदे इत्यादी माहितीसाठी ://./४ या लिंकद्वारे किंवा सोबत दिलेला स्कॅन करावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त.राजु वाकुडे यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजीनगर विभागाची तातडीची बैठक

# पीक परिस्थितीचा अहवाल सादर करा- महसूल मंत्री बावनकुळे यांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार यांनी पीक परिस्थितीची पाहणी करुन सोमवारी अहवाल सादर करावा,असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज यंत्रणेला दिले. श्री. बावनकुळे यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे आज आढावा घेतला. विभागीय आयुक्त जी.श्रीकांत तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या आढावा बैठकीत सहभागी झाले होते. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. त्यापार्श्वभुमिवर शेतकऱ्यांची पीक पाण्याची तसेच पशुधनाच्या चाऱ्याची नेमकी स्थिती काय आहे, याबाबत वस्तूनिष्ठ माहिती येत्या दोन दिवसात सादर करावी. त्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतांवर जाऊन पाहणी करावी. पीक स्थितीचा आढावा घ्यावा,असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागाची माहिती सादर करण्यात आली की, विभागात सरासरी पर्जन्यमानाच्या ५७ .७८ टक्के पाऊस झाला आहे.मागील वर्षी याच तारखेपर्यंत १०६.३८ टक्के पर्जन्यमान नोंदविण्यात आले होते. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील पर्जन्यमान याप्रमाणे- छत्रपती संभाजीनगर-८२.३६ टक्के, जालना-८०.०४ टक्के, नांदेड-७४.२३ टक्के, हिंगोली-७०.०८ टक्के, बीड-६४.०५ टक्के, धाराशिव-६२.७३ टक्के, परभणी-५५.३४ टक्के आणि लातूर-५२.१८ टक्के. विभागात एकूण ४९६ मंडळे असून सर्वाधिक २१८ मंडळे हे मध्यम (५० ते ७५ टक्के) पावसाच्या श्रेणीत आहेत. विभागातील प्रकल्पांमध्ये मोठ्या ११ प्रकल्पात ६६.७४ टक्के जलसाठा असून मध्यम प्रकल्प ७६ असून त्यात २१.३४ टक्के तर लघु प्रकल्प ७८० असून त्यात २०.४८ टक्के जलसाठा आहे. विभागात सरासरी ९३ टक्के क्षेत्रावर खरीपाची पेरणी झाली आहे. विभागात असलेल्या ५५.६६ लक्ष जनावरांसाठी १ कोटी ०७ मे.टन चारा साठा उपलब्ध आहे. पावसाचा खंड दि.२३ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर हा दीर्घ म्हणजेच २० दिवसांचा खंड आहे.

येत्या दोन दिवसांत पाहणी करुन अहवाल सादर करावा,असे निर्देश महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

# शेख अब्दुल रहीम यांना महाराष्ट्र युवा गौरव सन्मान २०२६ जाहीर; शैक्षणिक व सामाजिक कार्याचा होणार गौरव

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**



शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उल्लेखनीय आणि आदर्श कार्य करणारे शिक्षक श्री. शेख अब्दुल रहीम शेख बाबू (माजी अध्यक्ष: हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन तथा सहशिक्षक: चौधरी शेख मन्नाबी उर्दू प्राथमिक शाळा, छत्रपती संभाजीनगर) यांची मानाच्या महाराष्ट्र युवा गौरव सन्मान २०२६ या पुरस्कारासाठी एकमताने निवड करण्यात आली आहे.

औरंगाबाद युवा आणि युवा शक्ती पत्रकार संघ यांच्या २१ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून या राज्यस्तरीय पुरस्काराची घोषणा करण्यात आली. संपादक मंडळ व निवड समितीने शेख अब्दुल रहीम सर यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण, प्रेरणादायी आणि समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला. या निवडीचे अधिकृत पत्र मुख्य संपादक तथा संस्थापक अध्यक्ष अब्दुल कय्यूम अब्दुल रशीद यांच्या स्वाक्षरीने जाहीर करण्यात आले असून, सल्लागार मंडळ व समिती सदस्यांनी त्यांचे मनः पूर्वक कौतुक केले आहे.

हा भव्य गौरव सोहळा बुधवार, २८ ऑक्टोबर २०२६ रोजी ठीक रात्री ७.०० वाजता भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, टी.व्ही. सेंटर रोड, मजनू हिल, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत शेख अब्दुल रहीम यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शेख अब्दुल रहीम यांनी हा पुरस्कार त्यांच्या दिवंगत मातोश्री आबेदा बी यांना समर्पित केले आहे..

## जालना जिल्ह्यातील कुणबी जात प्रमाणपत्रासाठीच्या १३ शिबिरात ४७ अर्ज प्राप्त

### आतापर्यंत एकूण २०४ अर्ज प्राप्त

**जालना – प्रतिनिधी**

कुणबी, कुणबी–मराठा व मराठा–कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यासाठी जिल्ह्यात दि. १२ सप्टेंबर रोजी आयोजित १३ शिबिरांमध्ये एकूण ४७ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे. कुणबी, कुणबी–मराठा व मराठा–कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यासाठी जिल्ह्यात दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या तीन दिवसात एकूण २०४ अर्ज प्राप्त झाले आहेत.

आज झालेल्या शिबिरात तालुकानिहाय प्राप्त अर्जांमध्ये जालना तालुक्यातील दोन शिबिरांत ९, बदनापूर तालुक्यातील दोन शिबिरांत १७, भोकरदन तालुक्यातील दोन शिबिरांत १६, तर जाफराबाद तालुक्यातील एका शिबिरात ५ अर्ज प्राप्त झाले. अंबड व घनसावंगी तालुक्यांत प्रत्येकी दोन, तसेच परतूर व मंठा तालुक्यांत प्रत्येकी एक शिबिर आयोजित करण्यात आले.

जालना उपविभागात चार शिबिरांमधून २६, तर भोकरदन उपविभागात तीन शिबिरांमधून २१ अर्ज प्राप्त झाले.

अंबड उपविभागातील चार आणि परतूर उपविभागातील दोन शिबिरांत एकही अर्ज प्राप्त झाला नाही. प्राप्त सर्व ४७ अर्ज न्यायमूर्ती शिंदे समिती प्रवर्गातील असून गॅझेट प्रवर्गातील अर्ज प्राप्त झालेला नाही. तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या निर्णयानंतर प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्यात येतील, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

# रेखा भगवान शेजुळ यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित

**जालना - प्रतिनिधी**




शिक्षक दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ जालना मर्चंट सिटी, जालना यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रयाग प्राथमिक विद्यालयातील शिक्षिका रेखा भगवान शेजुळ यांना यंदाचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यास बदनापूरचे गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

तसेच लायन्स क्लब ऑफ जालना मर्चंट सिटीचे अध्यक्ष आनंद वाघमारे, सचिव सुनील भगत, सदस्य सुनील देशमुख, प्राध्यापक पवन देशमुख, क्लबचे पदाधिकारी, जालना शहरातील प्रतिष्ठित मान्यवर आणि शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते रेखा भगवान शेजुळ यांना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व नारळ प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, विविध शैक्षणिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत दिलेले योगदान यांची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

प्रयाग प्राथमिक विद्यालयाचे पदाधिकारी दिनेश भुतेकर, मुख्याध्यापिका सविता भुतेकर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद यांनी रेखा शेजुळ यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच बाळासाहेब कावळे व साहिल शेजुळ यांनीही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# प्लास्टिक फुलांची सर्रास विक्री थांबवा; अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक!

## *नैसर्गिक फुल उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका; आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी.*

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर शहर व तालुक्यासह जालना जिल्ह्यात तसेच महाराष्ट्रातील विविध भागांत प्लास्टिक फुलांची खुलेआम साठवणूक, व्यापार व विक्री सुरू असल्याने नैसर्गिक फुल उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. प्लास्टिक फुले आरोग्य व पर्यावरणासाठी घातक असल्याने त्यांच्यावर असलेल्या निर्बंधांची प्रभावी अंमलबजावणी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे फुल उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.



नैसर्गिक फुलांचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना लागवड, मजुरी, पाणी व इतर बाबींवर मोठा खर्च करावा लागतो. मात्र बाजारात प्लास्टिक फुले मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत असल्याने नैसर्गिक फुलांची मागणी व दरावर परिणाम होत असून उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. प्लास्टिक फुलांचा मोठ्या प्रमाणावर आयातीतून होणारा पुरवठा हा देशातील व राज्यातील फुल उत्पादकांच्या उपजीविकेसाठी चिंतेचा विषय असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गणेशोत्सव, महालक्ष्मी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर तपासणी मोहीम

आगामी गणेशोत्सव व महालक्ष्मी उत्सवाच्या काळात नैसर्गिक फुलांना मोठी मागणी असते.

त्यामुळे या काळात प्लास्टिक फुलांची विक्री वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनाने आतापासूनच बाजारपेठा, दुकाने व साठवणूक केंद्रांची तपासणी करून प्लास्टिक फुलांचा साठा आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे, आमदार बबनराव लोणीकर तसेच तालुका कृषी अधिकारी,यांना देण्यात आले आहे.

नैसर्गिक फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी प्लास्टिक फुलांच्या साठवणूक, व्यापार व विक्रीवर प्रभावी नियंत्रण आणण्याची मागणी करण्यात आली यावेळी मोठ्या संख्येने फुल उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# ऊसतोड कामगारांनी ऑनलाइन नोंदणी करूनच ऊसतोडीसाठी स्थलांतर करावे

### गाव संवाद मेळाव्यात विविध सामाजिक योजनांची माहिती; ऊसतोड कामगारांना योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**परतूर - प्रतिनिधी**

ऊसतोड कामगारांनी ऊसतोडीसाठी स्थलांतर करण्यापूर्वी आपली ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून, नोंदणी केल्याशिवाय ऊसतोडीसाठी जाऊ नये, असे आवाहन गाव संवाद मेळाव्यात करण्यात आले.



परतूर व घनसावंगी तालुक्यातील ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, यासाठी मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने गावपातळीवर ऊसतोड कामगारांसोबत संवाद कार्यशाळा व गाव संवाद मेळावे आयोजित करण्यात येत आहेत.

या संवाद मेळाव्यांमध्ये स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळांतर्गत ऑनलाइन नोंदणी, आभा कार्ड, आयुष्मान कार्ड, महा-ई-श्रम/ई-श्रम नोंदणी, रोजगार हमी योजना, बँक खाते, विमा योजना, आरोग्य सुविधा, आरोग्य शिबिरे, सामाजिक शिबिरे तसेच पोषणाची खात्री करण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत ऊसतोड कामगारांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

ऊसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना स्थलांतराच्या काळात शासकीय सेवा व योजनांपासून वंचित राहावे लागू नये, तसेच त्यांच्या आरोग्य, पोषण, रोजगार व सामाजिक सुरक्षेला बळकटी मिळावी, या उद्देशाने गावपातळीवर जनजागृती करण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी एकनाथ राऊत, राजेश वाघमारे, सुरेखा वाघमारे, दुर्गा नाडे, महादेव खरात, आकाश चैगुले व नामदेव नाडे यांची उपस्थिती व सहकार्य लाभत आहे.

ऊसतोडीसाठी जाण्यापूर्वी ऑनलाइन नोंदणी करा, आवश्यक कागदपत्रे व शासकीय योजनांशी जोडलेले लाभ सुनिश्चित करा आणि सुरक्षितपणे स्थलांतर करा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.